(८१)

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक:मागास २००१/प्रक्र४०८/३४
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ दि.२० एप्रिल, २००१

**वाचा:** शासन निर्णय ,क्रमांक:मागास १०९८/प्रक्र७३/३४ दिनांक २०/१०/९९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग

**प्रस्तावना:-**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी आपल्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रकमेतून वैयक्तीक व सामुहीक लाभाच्या कोणकोणत्या योजना घ्याव्यात,त्यासाठी लाभार्थी निवडीचे निकष काय असावेत,२० टक्के रकमेसाठी विचारात घ्यावयाच्या उत्पन्नाच्या बाबी,योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रक व ठेवावयाच्या आवश्यक नोंदवहया याबातत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक आदेश देण्यात आले आहेत.कांही जिल्हा परिषदांनी या योजनेसाठीच्या लाभार्थी निवडीच्या निकष व कार्यपदधतीमध्ये बदल करण्याची मागणी शासनाकडे केली होती.त्यांच्या मागणीस अनुसरून सदर आदेशामधील लाभार्थी निवडीच्या निकष व कार्यपदधतीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

सदर शासन निर्णयाचये उपरोक्त दिनांक २० ऑक्टोबर १९९९ च्या शासन निर्णयामधील लाभार्थी निवडीच्या कार्यपदधतीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

१) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असेल तर त्यांना लाभ देण्यांत येवू नये.

२) संदर्भाधिन शासन निर्णयामधील लाभार्थी निवडीच्या कार्यपदधतीमधील क्रमांक १ व २ मधील अटी रद्द करण्यात येत आहेत. लाभार्थी निवड करण्यासाठीचे निकष ठरविण्याचे अधिकार समाज कल्याण समितीला असेल व त्यास मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला असतील. हे करित असतांना गावातील खऱ्या गरिबाची निवड होईल याची खात्री राहील असे निकष ठरवावेत. तसेच स्थानिक संदर्भानुसार कुटुंबाच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा निश्चित करावी.

समाज कल्याण समितीने लाभार्थी निवडीचा जो ठराव मंजुर होईल त्यास योग्य ती प्रसिध्दी देऊन त्याबाबत सुचना व आक्षेप मागविण्यात यावेत.सदर सुचना व आक्षेपांचा विचार करून तयार केलेल्या अंतिम प्रस्तावास सर्वसाधारण सभेत मान्यता घ्यावी.

11 MAY 2001

कोल्हापूर जिल्हा परिषद
नोंदणी शाखा
विभाग २५ क्रमांक ९३
तारीख 2 MAY 2001